भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# प्रत्यर्पण अधिनियम, १९६२

**(सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ३४)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Extradition Act, 1962

**(Act No. 34 of 1962)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[**किंमत** : रुपये २७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि एक्स्ट्रॅडीशन ॲक्ट, १९६२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठ ७८ ते ८७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Extradition Act, 1962 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November, 2006 on pages 78 to 87.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 9th November, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# प्रत्यर्पण अधिनियम, १९६२

## कलमांचा क्रम

**कलमे**


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

२. व्याख्या

३. अधिनियम लागू होणे

प्रकरण दोन

**ज्यांना प्रकरण तीन लागू होत नाही अशा विदेशी राज्यांना परागंदा गुन्हेगारांचे प्रत्यर्पण करणे**

४. प्रत्यर्पित करण्यासाठी मागणी

५. दंडाधिकाऱ्यामार्फत चौकशीचा आदेश

६. अटकेचे वॉरंट काढणे

७. दंडाधिकाऱ्यासमोरील कार्यपद्धती

८. परागंदा गुन्हेगाराचे प्रत्यर्पण

९. विवक्षित प्रकरणी अटकेचे वॉरंट काढण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार

१०. पुरावा म्हणून निशाण्या, जबानी व इतर दस्तऐवज स्वीकारणे व त्यांचे अधिप्रमाणन

११. ज्यांना प्रकरण तीन लागू होते अशा देशांना हे प्रकरण लागू होणार नाही.

प्रकरण तीन

**परागंदा गुन्हेगारांना प्रत्यर्पण ठराव केलेल्या विदेशी राज्यांकडे परत पाठविणे**

१२. प्रकरण लागू होणे

१३. विदेशी राज्यांतील परागंदा गुन्हेगारांना पकडणे व परत पाठवणे याबाबतचे दायित्व

१४. पृष्ठांकित व तात्पुरते वॉरंट

१५. परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी पृष्ठांकित वॉरंट

१६. परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी तात्पुरते वॉरंट

१७. परागंदा गुन्हेगाराला पकडण्यात आल्यानंतर करावयाची कार्यवाही

१८. परागंदा गुन्हेगाराला वॉरंटद्वारे परत पाठवणे.

प्रकरण चार

**विदेशी राज्ये यांच्याकडून आरोपी किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तींचे प्रत्यर्पण किंवा परत पाठवणे**

१९. जी विदेशी राज्यात आहे अशा आरोपी किंवा दोषसिद्ध झालेल्या व्यक्तीला भारतामध्ये प्रत्यार्पित करण्याची किंवा परत पाठविण्याची मागणी करण्याची पद्धत किंवा वॉरंटचा नमुना.

२०. प्रत्यर्पित करण्यात किंवा परत पाठवण्यात आलेल्या आरोपी किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीला घेऊन जाणे

२१. विदेशी राज्याद्वारे प्रत्यर्पित केलेल्या किंवा परत पाठवलेल्या आरोपीच्या किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीच्या विवक्षित अपराधांसाठी न्यायचौकशी न करणे.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

२२. परागंदा गुन्हेगारांना अटक करणे आणि प्रत्यर्पित किंवा परत पाठवणे याबाबतचे दायित्व

२३. समुंद्रावर किंवा हवेत (आकाशात) घडलेल्या अपराधांबाबत अधिकारिता

२४. पकडलेल्या व्यक्तीचे प्रत्यर्पण किंवा परत पाठवणी दोन महिन्यांच्या कालावधीत न झाल्यास, त्या व्यक्तीला मुक्त करणे.

२५. अटक केलेल्या व्यक्तीला जामीनावर सोडणे

२६. प्रत्यर्पण अपराधांना अपप्रेरणा देणे

२७. वॉरंटान्वये पकडणे व त्यातून निसटल्यावर पुन्हा पकडणे कायदेशीर असणे

२८. परागंदा गुन्हेगाराजवळ आढळून आलेली मालमत्ता

२९. कोणत्याही परागंदा गुन्हेगाराला मुक्त करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

३०. एकसमयावच्छेदी मागणी

३१. प्रत्यर्पणावरील बंधने

३२. कलम २९ व कलम ३१ त्यांच्या कोणत्याही फेरबदलाशिवाय लागू असणे

३३. या अधिनियमाचा, विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ यावर परिणाम न होणे

३४. राज्यक्षेत्रातील अधिकारिता

३४क. प्रत्यर्पणास नकार दिल्यावर खटला भरणे

३४ख. तात्पुरती अटक

३४ग. मृत्युदंडाच्या शिक्षेऐवजी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद

३५. अधिसूचित आदेश व अधिसूचना संसदेपुढे ठेवणे

३६. नियम करण्याचा अधिकार

३७. निरसन व व्यावृत्ती

**अनुसूची**

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी-इंग्रजी शब्दसूची

# प्रत्यर्पण अधिनियम, १९६२

**(१९६२ चा अधिनियम क्रमांक ३४)**

( ६ ऑगस्ट २००६, रोजी यथाविद्यमान)

[१५ सप्टेंबर, १९६२]

**परागंदा गुन्हेगारांच्या प्रत्यर्पणाबाबतच्या कायद्यांचे एकत्रीकरण व त्यात सुधारणा करण्यासाठी [१][आणि त्याच्या संबंधातील किंवा आनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी] अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या तेराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :----

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, "प्रत्यर्पण अधिनियम, १९६२" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,----

[२][(क) "सयुंक्त अपराध" याचा अर्थ, विदेशी राज्यात किंवा भारतात, पूर्णतः किंवा अंशतः घडलेली एखाद्या व्यक्तीची कृती किंवा वर्तणूक, असा आहे. परंतु, त्याचा परिणाम किंवा अभिप्रेत असलेला परिणाम एकंदरीत विचारात घेता, तो भारतातील, किंवा, यथास्थिति, विदेशी राज्यातील प्रत्यर्पण अपराध ठरेल];

(ख) "दोषसिद्धी" व "दोष सिद्ध झालेला" यात, जी व्यक्ती विदेशी कायद्यान्वये न्यायालयाच्या अवमानाकरिता दोष सिद्ध झालेली असेल तिचा समावेश किंवा निर्देश होत नाही, परंतु "आरोपी व्यक्ती" यात, न्यायालयाच्या अवमानाकरिता अशा प्रकारे दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीचा समावेश होतो ;

[२][(ग) "प्रत्यर्पण अपराध" याचा अर्थ,----

(एक) ज्या राज्याशी संधिकरार करण्यात आला आहे अशा विदेशी राज्याच्या संबंधात, त्या राज्याशी केलेल्या प्रत्यर्पण संधीमध्ये तरतूद केलेला अपराध, असा आहे ;

(दोन) संधिकरार केलेल्या राज्याव्यतिरिक्त अन्य विदेशी राज्याच्या संबंधात, भारताच्या किंवा विदेशी राज्याच्या कायद्यान्वये एक वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरणारा अपराध, असा आहे आणि त्यात संयुक्त अपराधाचा समावेश होतो] ;

(घ) "प्रत्यर्पण संधिकरार" याचा अर्थ, भारताने विदेशी राज्याशी परागंदा गुन्हेगारांच्या प्रत्यर्पणासंबंधात केलेला संधिकरार, [३][करार किंवा व्यवस्था], असा आहे, आणि त्यात दिनांक १५ ऑगस्ट १९४७ च्या पूर्वी परागंदा गुन्हेगारांच्या प्रत्यर्पणासंबंधात केलेल्या व भारताला लागू असलेल्या व बंधनकारक असलेल्या कोणत्याही संधिकराराचा, [३][कराराचा किंवा व्यवस्थेचा] समावेश होतो ;

(ङ) "विदेशी राज्य" याचा अर्थ, भारताबाहेरील [४][****] कोणतेही राज्य, असा आहे आणि त्यात अशा राज्याचा प्रत्येक घटक भाग, वसाहत किंवा आश्रित देश, यांचा समावेश होतो ;

[५][(च) "परागंदा गुन्हेगार" याचा अर्थ एखाद्या विदेशी राज्याच्या अधिकारितेच्या कक्षेत ज्या व्यक्तीवर प्रत्यर्पण अपराधाचा आरोप आहे किंवा जिचा दोष सिद्ध झालेला आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात, जी व्यक्ती, भारतात असताना विदेशी राज्यातील प्रत्यर्पण अपराध घडविण्यासाठी कट करते, अपराध करण्याचा प्रयत्न करते किंवा अपराध घडण्यात सहाय्यभूत म्हणून अपप्रेरणा देते किंवा सहभागी होते, अशा व्यक्तीचा समावेश होतो] ;

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम २ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "किंवा करार" या ऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हा मजकूर गाळला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

(छ) "दंडाधिकारी" याचा अर्थ, प्रथमवर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी, असा आहे ;

(ज) "अधिसूचित आदेश" याचा अर्थ, **राजपत्रात** अधिसूचित केलेला आदेश, असा आहे ;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे; आणि

(ञ) "संधीकरार केलेले राज्य" याचा अर्थ, ज्याच्या बरोबर केलेला प्रत्यर्पण संधीकरार अंमलात आहे असे विदेशी राज्य, असा आहे.

अधिनियम लागू होणे.

**३.** [१][(१) केंद्र सरकारला, अधिसूचित आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, प्रकरण तीन वगळता, या अधिनियमाच्या तरतुदी, या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे त्या विदेशी राज्याला किंवा त्याच्या भागाला लागू होतील];

(२) केंद्र सरकारला, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या त्याच अधिसूचित आदेशाद्वारे किंवा त्यानंतरच्या कोणत्याही अधिसूचित आदेशाद्वारे अधिनियमाचे लागू होणे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा भारताच्या भागामध्ये आढळलेल्या किंवा असल्याचा संशय असलेल्या परागंदा गुन्हेगारांपुरते निर्बंधित असेल.

(३) जेव्हा अधिसूचित आदेश कोणत्याही संधीकरार केलेल्या राज्याच्या संबंधातील असेल तेव्हा,----

(क) त्यात त्या राज्याशी केलेला प्रत्यपण संधीकरार संपूर्णतः वर्णन केलेला असेल ;

(ख) तो त्या संधी-कराराच्या कोणत्याही कालावधीहून अधिक काळ अंमलात राहणार नाही ; आणि

(ग) केंद्र सरकारला त्याच किंवा त्यानंतरच्या कोणत्याही अधिसूचित आदेशाद्वारे, या अधिनियमाचे लागू होणे, त्या राज्याशी केलेल्या संधीकराराच्या अंमलबजावणीसाठी इष्ट वाटेल अशा फेरबदलांना, अपवादांना, शर्तींना व विशेषतांना अधीन राहून करता येईल ;

[२][(४) जेव्हा भारताने कोणत्याही विदेशी राज्याशी कोणताही प्रत्यर्पण संधीकरार केलेला नसेल तेव्हा, केंद्र सरकारला, अधिसूचित आदेशाद्वारे, त्यात भारत व एखादे विदेशी राज्य हे पक्षकार आहे असा कोणताही अभिसंधी हा भारताने त्या विदेशी राज्याशी, त्या अभिसंधीत विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या संबंधातील प्रत्यपर्णाची तरतूद करणारा प्रत्यर्पण संधीकरार असल्याचे मानता येईल.]

## प्रकरण दोन

### ज्यांना प्रकरण तीन लागू होत नाही अशा विदेशी राज्यांना [३][***] परागंदा गुन्हेगारांचे प्रत्यर्पण करणे.

प्रत्यर्पित करण्यासाठी मागणी.

**४.** एखाद्या विदेशी राज्याच्या [४][***] परागंदा गुन्हेगाराला प्रत्यार्पित करण्याची मागणी केंद्र सरकारकडे पुढील मार्गाने करण्यात येईल :——

(क) विदेशी राज्याच्या [४][***] दिल्ली येथील राजनैतिक प्रतिनिधीमार्फत ; किंवा

(ख) त्या विदेशी राज्याच्या [४][***] सरकारने त्या राज्यातील [४][***] त्यांच्या राजनैतिक प्रतिनिधीमार्फत केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करून ;

आणि जर यांपैकी कोणताही मार्ग सोईस्कर नसेल तर, विदेशी राज्याच्या [४][***] सरकारने भारत सरकारशी केलेल्या व्यवस्थेनुसार ठरवण्यात आलेल्या इतर मार्गाने अशी मागणी करण्यात येईल.

दंडाधिकाऱ्यामार्फत चौकशीचा आदेश.

**५.** जेव्हा अशी मागणी करण्यात येईल तेव्हा, केंद्र सरकारला योग्य वाटल्यास, त्याला तो अपराध ज्या दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत घडला तर, त्या अपराधाची चौकशी करण्याची अधिकारिता असती, अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, त्या प्रकरणात चौकशी करण्याचा निदेश देणारा आदेश काढता येईल.

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

**६.** कलम ५ अन्वये केंद्र सरकरकडून आदेश मिळाल्यावर, दंडाधिकारी परागंदा गुन्हेगाराच्या अटकेसाठी वॉरंट काढील. **अटकेचे वॉरंट काढणे.**

**७.** (१) जेव्हा परागंदा गुन्हेगार दंडाधिकाऱ्यासमोर हजर होईल किंवा त्याला हजर करण्यात येईल तेव्हा, दंडाधिकारी, शक्य तेथवर, त्याच रीतीने त्या प्रकरणाची चौकशी करील आणि जणू काही, ते प्रकरण सत्र न्यायालय किंवा उच्च न्यायालय याच्याकडून न्यायचौकशी करण्याजोगे असल्याप्रमाणे त्याला तशीच अधिकारिता व अधिकार असतील. **दंडाधिकाऱ्या-समोरील कार्यपद्धती.**

(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, दंडाधिकारी, विशेष करून, विदेशी राज्याच्या [१][***] मागणीच्या पुष्ट्यर्थ सादर करण्यात आलेला असा पुरावा आणि परागंदा गुन्हेगाराच्या वतीने सादर करण्यात येईल असा कोणताही पुरावा स्वीकारील, त्यात ज्या अपराधाबद्दल परागंदा गुन्हेगारावर आरोप ठेवण्यात आला असेल किंवा दोष सिद्ध करण्यात आला असेल तो अपराध, राजकीय स्वरूपाचा आहे किंवा प्रत्यर्पण अपराध नाही, हे दर्शवणाऱ्या कोणत्याही पुराव्याचा समावेश होईल.

(३) जर दंडाधिकाऱ्याचे असे मत असेल की, सकृतदर्शनी ते प्रकरण विदेशी राज्याच्या [१][***] मागणीच्या पुष्ट्यर्थ तयार करण्यात आलेले नाही तर, तो परागंदा गुन्हेगाराला सोडून देईल.

(४) जर दंडाधिकाऱ्याचे असे मत, असेल की, सकृतदर्शनी ते प्रकरण विदेशी राज्याच्या [१][***] मागणीच्या पुष्ट्यर्थ तयार करण्यात आलेले आहे तर, तो त्या परागंदा गुन्हेगाराला, केंद्र सरकारच्या आदेशाची प्रतीक्षा करण्यात येईपर्यंत कारागृहाच्या सुपूर्द करील आणि त्याच्या चौकशीचा अहवाल केंद्र सरकारला सादर करील व अशा अहवालासोबत, परागंदा गुन्हेगाराला, केंद्र सरकारच्या विचारार्थ सादर करण्याची इच्छा असलेले कोणतेही लेखी निवेदन पाठवील.

**८.** कलम ७ च्या पोट कलम (४) अन्वये अहवाल व निवेदन मिळाल्यावर, जर केंद्र सरकारचे असे मत असेल की, त्या परागंदा गुन्हेगाराला विदेशी राज्याकडे [१][***] प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे तर, ते त्या परागंदा गुन्हेगाराच्या अभिरक्षेसाठी व त्याला तेथून हलविण्यासाठी आणि त्याला वॉरंटमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी व नमूद केलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्यासाठी वॉरंट काढील. **परागंदा गुन्हेगाराचे प्रत्यर्पण.**

**९.** (१) जेव्हा एखाद्या दंडाधिकाऱ्याला असे दिसून येईल की, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीतील एखादी व्यक्ती ही, विदेशी राज्याची [१][***] परागंदा गुन्हेगार आहे तेव्हा, तो त्या व्यक्तीवर ज्या अपराधांचा आरोप असेल किंवा दोष सिद्ध करण्यात आला असेल तो अपराध त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत घडला असता तर, त्याच्या मते, जी माहिती व जो पुरावा वॉरंट काढण्यासाठी समर्थनीय ठरला असता, अशा माहितीच्या व पुराव्याच्या आधारे, त्या व्यक्तीच्या अटकेसाठी त्यास योग्य वाटल्यास वॉरंट काढील. **विवक्षित प्रकरणी अटकेचे वॉरंट काढण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.**

(२) दंडाधिकारी, पोट कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या वॉरंटचा अहवाल केंद्र सरकारला ताबडतोब पाठवील आणि माहिती व पुरावा किंवा त्याच्या प्रमाणित प्रती त्या सरकारला देईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या वॉरंटावर अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला, तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीकरिता, त्या कालावधीत दंडाधिकाऱ्याला केंद्र सरकारकडून अशा व्यक्तीच्या संदर्भात, कलम ५ अन्वये काढण्यात आलेला आदेश मिळाल्याशिवाय अटकावून ठेवले जाणार नाही.

**१०.** (१) एखाद्या विदेशी राज्याच्या [१][***] परागंदा गुन्हेगाराविरुद्धच्या या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये निशाण्या व जबान्या (मग त्या, जिच्याविरुद्ध त्यांचा उपयोग करावयाचा त्या व्यक्तीच्या उपस्थितीत मिळालेल्या किंवा घेण्यात आलेल्या असोत वा नसोत) आणि त्यांच्या प्रती व वस्तुस्थितिनिदर्शक अधिकृत प्रमाणपत्रे व ती वस्तुस्थिती नमूद करणारे न्यायिक दस्तऐवज हे, जर ते रीतसर अधिप्रमाणित करण्यात आलेले असतील तर, पुरावा म्हणून स्वीकृत करण्यात येतील. **पुरावा म्हणून निशाण्या, जबानी व इतर दस्तऐवज स्वीकारणे व त्यांचे अधिप्रमाणन.**

(२) भारताबाहेरील कोणत्याही न्यायालयाद्वारे काढण्यात आलेले किंवा घेण्यात आलेले वॉरंट, जबान्या किंवा शपथपूर्वक निवेदने किंवा त्यांच्या प्रती किंवा अशा कोणत्याही न्यायालयासमक्ष दोष

---

१. कलम ३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

सिद्ध झाल्याबद्दलची प्रमाणपत्रे किंवा वस्तुस्थितिनिदर्शक न्यायिक दस्तऐवज हे पुढील बाबतीत रीतसर अधिप्रमाणित केले असल्याचे मानण्यात येईल :—

(क) जर ते वॉरंट, ते ज्या राज्यात [१][***]काढण्यात आले असेल त्याच्या किंवा अशा राज्यात [१][***] वा अशा राज्यासाठी [१][***] काम करणाऱ्या न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने स्वाक्षरित करणे अभिप्रेत असेल तर ;

(ख) जर जबान्या किंवा निवेदने किंवा त्याच्या प्रती, या ज्या राज्यात [१][***] त्या घेण्यात आलेल्या असतील अशा राज्याच्या किंवा अशा राज्यात [१][***] किंवा अशा राज्यासाठी [१][***] काम करणाऱ्या न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने स्वतःच्या स्वाक्षरीने मूळ जबान्या किंवा निवेदने असल्याचे, किंवा यथास्थिति, त्याच्या सत्य प्रती असल्याचे प्रमाणित करणे अभिप्रेत असेल तर ;

(ग) दोष सिद्ध झाल्याचे प्रमाणपत्र किंवा दोष सिद्ध झाल्याची वस्तुस्थिती नमूद करणारा न्यायिक दस्तऐवज, जेथे तो दोष सिद्ध झाला असेल त्या राज्याच्या [१][***] किंवा त्या राज्यात [१][***] किंवा राज्यासाठी [१][***] काम करीत असलेल्या न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने प्रमाणित करणे अभिप्रेत असेल तर ;

(घ) यथास्थिति, वॉरंट, जबान्या, निवेदने, प्रती, प्रमाणपत्रे व न्यायिक दस्तऐवज हे, काही साक्षीदारांच्या शपथेवर किंवा ते [१][***] जेथे काढण्यात, घेण्यात किंवा देण्यात आले असतील त्या राज्याच्या [१][***] एखाद्या मंत्र्याच्या अधिकृत शिक्क्यानिशी अधिप्रमाणित करण्यात आले असतील तर.

**ज्यांना प्रकरण तीन लागू होते अशा [३][***]देशांना हे प्रकरण लागू होणार नाही.**

**११.** [३][***] ज्या परागंदा गुन्हेगारांना प्रकरण तीन लागू होते त्यांना या प्रकरणातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

## प्रकरण तीन

### परागंदा गुन्हेगारांना प्रत्यर्पण ठराव केलेल्या [४][विदेशी राज्यां]कडे परत पाठविणे

**प्रकरण लागू होणे.**

**१२.** (१) हे प्रकरण, ज्या [५][विदेशी राज्याशी] केलेल्या प्रत्यर्पण ठरावाच्या कारणास्तव त्या [६][राज्यांना] लागू करणे केंद्र सरकारला इष्ट वाटेल, अशाच राज्यांना केवळ लागू होईल.

(२) असे प्रत्येक लागू होणे, अधिसूचित आदेशाद्वारे करण्यात येईल आणि केंद्र सरकार त्याच किंवा तत्सम कोणत्याही अधिसूचित आदेशाद्वारे, असा निदेश देईल की, हे प्रकरण व प्रकरण एक, चार व पाच ही अशा कोणत्याही [५][विदेशी राज्याच्या] संबंधात केंद्र सरकारला, त्या ठरावाच्या कार्यान्वयनाच्या प्रयोजनार्थ, त्या आदेशात विनिर्दिष्ट करणे योग्य वाटतील असे फेरबदल, अपवाद, शर्ती व मर्यादा यांच्या अधीनतेने लागू होतील.

**[३][विदेशी राज्यांतील] परागंदा गुन्हेगारांना पकडणे व परत पाठवणे याबाबतचे दायित्व.**

**१३.** ज्यास हे प्रकरण लागू आहे. अशा कोणत्याही [५][विदेशी राज्याच्या] परागंदा गुन्हेगार भारतात असल्याचे आढळेल तेव्हा, त्याला पकडण्याचे व या प्रकरणात विहित केलेल्या रीतीने त्या [५][विदेशी राज्यात] त्याला परत पाठवण्याचे दायित्व राहील.

**पृष्ठांकित व तात्पुरते वॉरंट.**

**१४.** एखाद्या परागंदा गुन्हेगाराला भारतात पृष्ठांकित किंवा तात्पुरत्या वॉरंटअन्वये पकडण्यात येईल.

**परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी पृष्ठांकित वारंट.**

**१५.** ज्याला हे प्रकरण लागू आहे. अशा कोणत्याही [५][विदेशी राज्यात] एखाद्या परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी वॉरंट काढण्यात आलेले असेल आणि असा परागंदा गुन्हेगार भारतात असेल किंवा भारतात असल्याबाबतचा संशय असेल तेव्हा, केंद्र सरकारची, जर काढण्यात आलेले

---

१. १९९३ चा अधिनियम, ६६ कलम ३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).
३. १९९३ चा अधिनियम ६६, कलम ८ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).
५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

वॉरंट काढण्यास कायदेशीर प्राधिकार असलेल्या व्यक्तीने काढलेले आहे अशी खात्री झाली तर, केंद्र सरकार , असे वॉरंट विहित पध्दतीने पृष्ठांकित करू शकेल, आणि असे पृष्ठांकित वॉरंट हे त्या वॉरंट करण्यासाठी पुरेसे प्राधिकारपत्र असेल.

**परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी तात्पुरते वॉरंट.**

१६. (१) कोणतीही दंडाधिकारी, हे प्रकरण लागू असलेल्या कोणत्याही [१](विदेशी राज्यातील) जो परागंदा गुन्हेगार भारतात असेल किंवा भारतात असल्याबाबतचा संशय असेल किंवा तो भारतात येण्याच्या मार्गावर असेल, अशा गुन्हेगारावर असलेला आरोप किंवा दोष सिद्ध झालेला अपराध त्याच्या अधिकारिता क्षेत्रात घडला असता तर, त्या गुन्हेगाराला पकडण्यासाठी, त्याच्या मते, वॉरंट काढण्यासाठी समर्थनीय ठरली असती अशा माहितीच्या आधारे व अशा परिस्थितीत तात्पुरते वॉरंट काढू शकेल.

(२) तात्पुरते वॉरंट काढणारा दंडाधिकारी, वॉरंट काढल्याची माहिती किंवा त्याच्या प्रमाणित प्रतीसह काढलेल्या वॉरंटबाबतचा अहवाल, तात्काळ केंद्र सरकारकडे पाठवील आणि केंद्र सरकारला, अशा वॉरंटानुसार ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला सोडून देणे इष्ट वाटल्यास, ते, त्या व्यक्तीला सोडून देईल.

(३) तात्पुरत्या वॉरंटवर ताब्यात घेण्यात आलेल्या परागंदा गुन्हेगाराला वेळोवेळी पृष्ठांकित वॉरंट सादर करण्यासाठी त्या त्या परिस्थितीत आवश्यक वाटेल इतक्या, परंतु, एकावेळी सात दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या वाजवी कालावधीसाठी प्रतिप्रेषित करण्यात येईल.

**परागंदा गुन्हेगाराला पकडण्यात आल्या नंतर करावयाची कार्यवाही.**

१७. (१) या प्रकरणानुसार, ज्याला ताब्यात घेण्यात आले आहे अशा व्यक्तीला, ज्या दंडाधिकाऱ्यापुढे आणण्यात आलेले असेल त्या दंडाधिकाऱ्याची, चौकशीनंतर जर अशी खात्री पटली की, परागंदा गुन्हेगाराला पकडण्यासाठी पृष्ठांकित केलेले वॉरंट रीतसर अधिप्रमाणित केलेले आहे आणि त्या परागंदा गुन्हेगारावर केलेला आरोप किंवा दोष सिद्ध झालेला अपराध, प्रत्यर्पण अपराध आहे तर, तो दंडाधिकारी, त्या परागंदा गुन्हेगाराला परत पाठवले जाईपर्यंत, त्या कालावधीसाठी कारागृहाकडे सुपूर्द करील आणि केंद्र सरकारला, त्याला कारागृहाकडे सुपूर्द करण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र तात्काळ पाठवील.

(२) अशा चौकशीनंतर दंडाधिकाऱ्याचे, जर असे मत झाले की, पृष्ठांकित वॉरंट हे रीतसर अधिप्रमाणित केलेले नाही किंवा अशा व्यक्तीवर केलेला आरोप किंवा दोष सिद्ध झालेला अपराध, प्रत्यर्पण अपराध नाही तर, तो दंडाधिकारी केंद्र सरकारकडून आदेश प्राप्त होईपर्यंत अशा व्यक्तीला अभिरक्षेत स्थानबद्ध ठेवील किंवा त्याला जामीनावर मुक्त करील.

(३) दंडाधिकारी, आपल्या चौकशीच्या संबंधातील निकालाचा अहवाल केंद्र सरकारला देईल आणि अशा अहवालासोबत परागंदा गुन्हेगाराला त्या शासनाच्या विचारार्थ, काही लिखित स्वरूपात निवेदन द्यावयाची इच्छा असेल तर तेही पाठवील.

**परागंदा गुन्हेगाराला वॉरंटद्वारे परत पाठवणे.**

१८. केंद्र सरकार, या प्रकरणान्वये, परागंदा गुन्हेगाराला कारागृहाच्या सुपूर्द केल्यानंतर कोणत्याही वेळी, त्याला अभिरक्षेत ठेवण्यासाठी आणि परागंदा गुन्हेगाराला संबंधित [२][विदेशी राज्याकडे] पाठवण्यासाठी आणि वॉरंटात नमूद करण्यात येईल त्या ठिकाणी व त्या व्यक्तीकडे त्याला सुपूर्द करण्यासाठी वॉरंट काढील.

## प्रकरण चार

## विदेशी राज्ये [३][***] यांच्याकडून आरोपी किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तींचे प्रत्यर्पण किंवा परत पाठवणे

**जी विदेशी राज्यात [३][***] आहे अशा आरोपी किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीला भारतामध्ये**

१९. (१) भारतात घडलेल्या एखाद्या प्रत्यर्पण अपराधाचा आरोप असलेल्या किंवा दोष सिद्ध झालेल्या आणि ज्या कोणत्याही विदेशी राज्याला [३][***] प्रकरण तीन लागू होत नाही अशा विदेशी राज्यात [३][***] असलेल्या किंवा असल्याचा संशय असलेल्या अशा व्यक्तीच्या प्रत्यर्पणासाठी केंद्र सरकार,-----

(क) दिल्ली येथील त्या राज्याच्या [३][***] राजनैतिक प्रतिनिधीकडे ; किंवा

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या वरील कलमाद्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

प्रत्यर्पित करण्याची किंवा परत पाठवण्याची मागणी करण्याची पद्धत किंवा वॉरंटचा नमुना.

(ख) त्या राज्याच्या [१][***] शासनाकडे, त्या राज्यातील [१][***] भारताच्या राजनैतिक प्रतिनिधीमार्फत, मागणी करू शकेल,

आणि यापैकी कोणतीही पद्धती सोईस्कर वाटत नसेल तर, ते राज्य [१][***] व भारत सरकार यांच्यात सहमतीने जी अन्य पद्धत निश्चित करण्यात येईल त्याद्वारे मागणी करण्यात येईल.

(२) ज्या कोणत्याही [२][विदेशी राज्यास] प्रकरण तीन लागू होते अशा [२][विदेशी राज्यात] जी व्यक्ती आहे किंवा असल्याचा संशय आहे, अशा कोणत्याही व्यक्तीला पकडण्यासाठी, भारतातील दंडाधिकाऱ्याने काढलेले वॉरंट विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

प्रत्यर्पित करण्यात किंवा परत पाठवण्यात आलेल्या आरोपी किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीला घेऊन जाणे.

**२०.** विदेशी राज्या [१][***] द्वारे प्रत्यर्पित करण्यात किंवा परत पाठवण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीवर प्रत्यर्पण अपराधाचा आरोप असेल किंवा तिचा दोष सिद्ध झाला असेल तिला अशा राज्यातून [१][***] काढण्यात आलेल्या तिच्या प्रत्यर्पण किंवा परत पाठवण्यासाठीच्या अटक वॉरंटान्वये भारतात आणण्यात येईल आणि योग्य प्राधिकाऱ्यांकडे कायद्यानुसार कार्यवाही करण्यासाठी सुपूर्द करण्यात येईल.

[३][विदेशी राज्याद्वारे प्रत्यार्पित केलेल्या किंवा परत पाठवलेल्या आरोपीच्या किंवा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीच्या विवक्षित अपराधांसाठी न्यायचौकशी न करणे.

**२१.** जेव्हा एखाद्या व्यक्तीला, कोणत्याही अशा एखाद्या अपराधाबाबत आरोपी किंवा दोष सिद्ध झाल्याचे ठरविण्यात आले असले, जर असा अपराध भारतात केला असता तर तो प्रत्यर्पण अपराध ठरला असता तेव्हा, त्या व्यक्तीला विदेशी राज्याकडून प्रत्यर्पित किंवा परत पाठवण्यात आल्यास अशा व्यक्तीची ती त्या राज्याकडे पुन्हा जाईपर्यंत किंवा तिला परत जाण्याची तशी संधी दिली जाईपर्यंत, पुढील अपराधाव्यतिरिक्त अन्य अपराधाची भारतात न्यायचौकशी केली जाणार नाही :----

(क) ज्याच्या संबंधात तिला प्रत्यर्पित किंवा परत पाठवण्यात आले असेल असा प्रत्यर्पण अपराध ; किंवा

(ख) ज्याच्या संबंधात प्रत्यर्पित करण्याचा किंवा परत पाठवण्याचा कायदेशीर आदेश काढता येणार नाही अशा अपराधाव्यतिरिक्त तिला प्रत्यर्पित किंवा परत पाठवण्याच्या प्रयोजनार्थ सिद्ध झालेल्या तथ्यांमुळे उघड झालेला इतर कोणताही सौम्य अपराध ; किंवा

(ग) ज्या अपराधासंबंधात त्या विदेशी राज्याची संमती असेल असा अपराध.]

## प्रकरण पाच

## संकीर्ण

परागंदा गुन्हेगारांना अटक करुन प्रत्यार्पित करणे किंवा परत पाठवणे याबाबतचे दायित्व.

**२२.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, विदेशी राज्याच्या [४][***] प्रत्येक परागंदा गुन्हेगाराला, ज्या अपराधासंबंधात त्याचे प्रत्यर्पण करण्यात येणार असेल किंवा त्याला परत पाठवण्यात येणार असेल तो अपराध या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी किंवा नंतर घडलेला असला तरी, भारतातील न्यायालयाकडे त्या अपराधाच्या न्यायचौकशीची अधिकारिता असो वा नसो----त्याला अटक करून, प्रत्यर्पित करण्याचे किंवा परत पाठवण्याबाबतचे दायित्व राहील.

समुद्रावर किंवा हवेत (आकाशात) घडलेल्या अपराधांबाबत अधिकारिता.

**२३.** ज्या अपराधाबाबत परागंदा गुन्हेगाराचे प्रत्यर्पण करणे किंवा त्याला परत पाठवणे अपेक्षित आहे असा अपराध, जेव्हा भारतातील कोणत्याही बंदरावर किंवा विमानतळावर येणाऱ्या, अशा कोणत्याही जलयानावर किंवा आकाशातील कोणत्याही विमानात, भारताच्या किंवा भारतीय प्रादेशिक सागरी क्षेत्राच्या सीमेबाहेरील भर समुद्रात असताना घडला असेल तेव्हा, केंद्र सरकार आणि ज्याची अधिकारिता त्या बंदराच्या किंवा विमानतळाच्या क्षेत्रात असेल असा कोणताही दंडाधिकारी, यांना या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करता येईल.

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, याच्या कलम ११ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे मूळ कलम २१ च्या ऐवजी नवीन कलम दाखल केले (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

**२४.** जर कोणत्याही परागंदा गुन्हेगाराचे, कोणत्याही विदेशी राज्याला [1][***] प्रत्यर्पण किंवा परत पाठवणी होईपर्यंत, या अधिनियमानुसार त्याला कारागृहाकडे सुपूर्द करण्यात आले असेल आणि त्याला असे कारागृहाकडे सूपूर्द केल्यानंतर, दोन महिन्यांच्या कालावधीत भारताबाहेर नेण्यात आले नाही तर, उच्च न्यायालय, परागंदा गुन्हेगाराकडून किंवा त्याच्या वतीने, अन्य व्यक्तीकडून अर्ज करण्यात आल्यावर आणि असा अर्ज करण्याच्या आपल्या हेतूची वाजवी नोटीस केंद्र सरकारला देण्यात आल्याचा पुरवा सादर करण्यात आल्यावर, अशा परागंदा गुन्हेगारास मुक्त करण्याचा आदेश, तद्‌विरुद्ध पुरेसे कारण दर्शवण्यात आले नाही तर, काढू शकेल.

पकडलेल्या आलेल्या व्यक्तीचे प्रत्यर्पण किंवा परत पाठवणी दोन महिन्यांच्या कालावधीत न झाल्यास, त्या व्यक्तीला मुक्त करणे.

**२५.** या अधिनियमाखाली अटक केलेला किंवा स्थानबद्ध केलेला जो परागंदा गुन्हेगार आहे अशा व्यक्तीला, [2][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) ] याच्या जामीनाबाबतच्या तरतुदी, त्याच्यावर जो आरोप ठेवण्यात आला असेल किंवा त्याचा दोष सिद्ध करण्यात आला असेल तो अपराध त्याने भारतात केला असता तर, ज्या रीतीने लागू झाल्या असत्या त्याच रीतीने लागू होतील आणि ज्या दंडाधिकाऱ्यासमोर त्या परागंदा गुन्हेगाराला आणण्यात आले असेल त्या दंडाधिकाऱ्याला, त्या संहितेच्या अधीन, अशा जामीनाच्या संबंधात एखाद्या सत्र न्यायालयाला जे अधिकार असतील व, यथास्थिति, जी अधिकारिता असेल तेच अधिकार असतील व तीच अधिकारिता असेल.

अटक केलेल्या व्यक्तींला जामीनावर सोडणे.

**२६.** ज्या कोणत्याही परागंदा गुन्हेगारावर कोणत्याही प्रत्यर्पण अपराधांचा [3][कट करणे, अपराध करण्याचा प्रयत्न करणे, त्यास चिथावणी देणे किंवा त्या अपराधात सहआरोपी म्हणून सहभागी असणे.] असा आरोप असेल किंवा त्याचा दोष सिद्ध झालेला असेल त्याने, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी तो अपराध केला असल्याचा त्यावर आरोप असल्याचे किंवा त्याचा दोष सिद्ध झाल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याला अटक केली जाण्यास व तो प्रत्यर्पित केला जाण्यास पात्र ठरेल.

प्रत्यर्पण अपराधांना अपप्रेरणा देणे.

**२७.** ज्या कोणत्याही व्यक्तीला, परागंदा गुन्हेगाराला पकडण्याचा निदेश वॉरंटाद्वारे देण्यात आला असेल, तिने त्या गुन्हेगाराला अभिरक्षेत ठेवणे आणि त्या वॉरंटमध्ये ज्या ठिकाणाचे नाव नमूद करण्यात आलेले असेल तेथे त्या वॉरंटांत नमूद केलेल्या व्यक्तीला हस्तांतरित करणे कायदेशीर असेल आणि जर अशी कोणतीही व्यक्ती वॉरंटास अनुसरून तिला सुपूर्द करण्यात आलेल्या त्या अभिरक्षेतून पळून गेली तर, तिला भारतीय कायद्याविरुद्ध अपराध करण्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीला जसे पळून गेल्यावर पुन्हा पकडण्यात येते तसेच पुन्हा पकडण्यात येईल.

वॉरंटान्वये पकडणे व त्यातून निसटल्यावर पुन्हा पकडणे कायदेशीर असणे.

**२८.** परागंदा गुन्हेगाराला अटक करण्यात येईल तेव्हा त्याच्या जवळ आढळून येणारी जी जी वस्तू प्रत्यर्पण आरोप सिद्ध करण्याचा पुरावा म्हणून महत्त्वाची ठरू शकेल, ती प्रत्येक वस्तू, अशा परागंदा गुन्हेगाराला प्रत्यर्पण करताना किंवा परत पाठवताना हस्तांतरित करण्यात येईल. मात्र, अशा वस्तूंच्या संबंधात तिऱ्हाईताचा काही हक्क असल्यास , त्याच्या अधीन राहून, अशा वस्तू हस्तांतरित केल्या जातील.

परागंदा गुन्हेगाराजवळ आढळून आलेली मालमत्ता.

**२९.** जर केंद्र सरकारला, परागंदा गुन्हेगाराच्या प्रकरणाचे स्वरूप क्षुल्लक आहे किंवा त्याला प्रत्यर्पित करण्याबाबतचा किंवा परत पाठवण्याबाबतचा अर्ज चांगल्या हेतूने करण्यात आलेला नाही या कारणास्तव किंवा न्यायाच्या हिताच्या दृष्टीने किंवा राजकीय कारणास्तव वा अन्यथा परागंदा गुन्हेगाराला प्रत्यर्पित करणे किंवा परत पाठविणे अन्याय वा अनिष्ट असल्याचे दिसून आले तर, केंद्र सरकार, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीस कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे, स्थगिती देऊ शकेल आणि असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये काढण्यात आलेले किंवा पृष्ठांकित करण्यात आलेले कोणतेही वॉरंट रद्द करण्यात यावे आणि ज्या व्यक्तीला अटक करण्यासाठी वॉरंट काढण्यात आले किंवा पृष्ठांकित करण्यात आले असेल, त्या व्यक्तीला मुक्त करण्यात यावे.

कोणत्याही परागंदा गुन्हेगाराला मुक्त करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

**३०.** एखाद्या परागंदा गुन्हेगाराच्या प्रत्यर्पणासाठी एकापेक्षा अधिक विदेशी राज्ये [4][***] यांच्याकडून मागणी प्राप्त झाल्यास, केंद्र सरकार, प्रकरणाची परिस्थिती विचारात घेता, अशा परागंदा गुन्हेगाराला, त्यास योग्य वाटेल, अशा राज्याकडे किंवा देशाकडे प्रत्यर्पित करील.

एकसमयावच्छेदी मागणी.

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम ३ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे दाखल केले (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे दाखल करण्यात आले (१८ डिसेंबर, १९९३ व तेव्हापासून).

४. १९९३ चा अधिनियम ६६, कलम १५ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

प्रत्यर्पणावरील बंधने.

**३१.** [1][(१)] एखाद्या परागंदा गुन्हेगाराला,---

(क) ज्या अपराधासाठी त्याला प्रत्यर्पित करण्याची अपेक्षा असेल त्या अपराधाचे स्वरूप जर राजकीय असेल किंवा त्याला ज्या दंडाधिकाऱ्यासमोर किंवा न्यायालयासमोर उभे केले असेल त्याचे किंवा केंद्र सरकारचे समाधान होईल अशाप्रकारे, त्याने, त्याला प्रत्यर्पित पत करण्यासंबंधातील मागणी किंवा वॉरंट, वस्तुत: राजकीय स्वरूपाच्या अपराधासाठी त्याची न्यायचौकशी व्हावी किंवा त्याला शिक्षा व्हावी या उद्देशाने करण्यात आली आहे, असे सिद्ध केले तर ;

(ख) ज्या अपराधासंबंधात त्याला प्रत्यर्पित करण्याची अपेक्षा आहे त्याचा खटला त्या राज्याच्या[2][***] कायद्यानुसार मुदतबाह्य झालेला असेल तर ;

[3][(ग) विदेशी राज्याच्या कायद्याद्वारे किंवा त्या विदेशी राज्याशी केलेल्या प्रत्यर्पण कराराद्वारे पुढील अपराधाव्यतिरिक्त अन्य अपराधासाठी त्या परागंदा गुन्हेगाराची त्या देशात न्यायचौकशी किंवा निवाडा करण्यात येऊ नये अशी तरतूद करण्यात आलेली नसेल तर,---

(एक) ज्या अपराधासंबंधात त्याला प्रत्यर्पित किंवा परत पाठवण्यात येणार असेल असा प्रत्यर्पण अपराध ;

(दोन) ज्या अपराधासंबंधात त्याच्या प्रत्यर्पणाचा किंवा परत पाठवण्याचा आदेश कायदेशीररीत्या काढता आला नसता अशा अपराधाव्यतिरिक्त अन्य, जो कोणताही अपराध त्याच्या प्रत्यर्पणाच्या किंवा परत पाठवण्याच्या प्रयोजनांसाठी सिध्द केलेल्या तथ्यांमुळे उघड झाला असेल, असा कोणताही सौम्य अपराध :

(तीन) ज्या अपराधासंबंधात, केंद्र सरकारची संमती घेण्यात आली असेल असा अपराध ;]

(घ) त्याला ज्या अपराधासाठी प्रत्यर्पित किंवा परत पाठवण्यात येणार असेल असा अपराध नसलेल्या एखाद्या अपराधासाठी त्याच्यावर भारतात कोणताही आरोप ठेवण्यात आला असेल किंवा तो भारतात कोणत्याही दोषसिध्दीसाठी शिक्षा भोगत असेल तर, त्याला दोषमुक्तीद्वारे किंवा त्याच्या शिक्षेचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा अन्यथा मुक्त करण्यात आले असेल तर ;

(ङ) दंडाधिकाऱ्याने त्याला कारागृहाकडे सुपूर्द केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांचा कालावधी पूर्ण झाला असेल तर,

विदेशी राज्याकडे [3][***] प्रत्यर्पित करण्यात किंवा परत पाठवण्यात येणार नाही.

[4][(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले अपराध हे राजकीय स्वरूपाचे अपराध असल्याचे समजले जाणार नाही.

(३) केंद्र सरकार, कोणत्याही विदेशी राज्याशी भारताने केलेला प्रत्यर्पण करार लक्षात घेऊन, अधिसूचित आदेशाद्वारे अनुसूचीत दिलेल्या यादीत कोणत्याही अपराधाचा समावेश किंवा वगळणूक करू शकेल.]

कलम २९ व कलम ३१ त्यांच्या कोणत्याही फेरबदलाशिवाय लागू असणे.

**३२.** कलम ३ किंवा कलम १२ मध्ये काहीही प्रतिकूल असले तरी, कलमे २९ व ३१ ही कोणत्याही फेरबदलाशिवाय प्रत्येक विदेशी राज्याला [5][***] लागू असतील.

या अधिनियमाचा, विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ यावर परिणाम न होणे.

**३३.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा, विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१) याच्या तरतुदी किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशावर परिणाम होणार नाही.

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम १६ द्वारे कलम ३१ ला त्या कलमाचा पोट कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे पोट-कलमे (२) व (३) दाखल करण्यात आली (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

५. १९९३ चा अधिनियम ६६, कलम १५ द्वारे मूळ मजकूर गाळला (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

**[1][राज्यक्षेत्रातील अधिकारिता.]**

३४. कोणत्याही व्यक्तीकडून विदेशी राज्यात एखादा प्रत्यर्पण अपराध घडल्यास, तो प्रत्यर्पण अपराध भारतात घडला असे मानण्यात येईल आणि अशी व्यक्ती, अशा अपराधासाठी भारतात खटला चालवला जाण्यास पात्र असेल.

**प्रत्यर्पणास नकार दिल्यावर खटला भरणे.**

३४क. जेव्हा केंद्र सरकारचे असे मत असेल की, एखाद्या परागंदा गुन्हेगाराला, विदेशी राज्याने केलेल्या प्रत्यर्पणाच्या विनंतीनुसार प्रत्यर्पित करणे किंवा परत पाठवणे शक्य नसेल तेव्हा, केंद्र सरकारला, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, अशा परागंदा गुन्हेगारावर भारतातच खटला चालवण्याची उपाययोजना करता येईल.

**तात्पुरती अटक.**

३४ख. (१) विदेशी राज्याकडून, एखाद्या परागंदा गुन्हेगाराला तात्काळ अटक करण्याबाबत तातडीची विनंती करण्यात आल्यावर, केंद्र सरकार, अशा परागंदा गुन्हेगाराला अटक करण्यासाठी तात्पुरते वॉरंट काढण्याची सक्षम अधिकारिता असलेल्या दंडधिकाऱ्याला तशी विनंती करील.

(२) पोटकलम (१) खाली अटक केलेल्या एखाद्या परागंदा गुन्हेगाराला ज्या दिनांकास, त्याला अटक करण्यात येईल त्या दिनांकापासून साठ दिवसांच्या उक्त कालावधीत, त्याला प्रत्यर्पित किंवा परत करण्याबाबत कोणतीही विनंती करण्यात आली नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीनंतर, त्याला सोडून देण्यात येईल.

**मृत्युदंडाच्या शिक्षेऐवजी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद.**

३४ग. त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी, भारतात जो प्रत्यर्पण अपराध मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र आहे, असा अपराध केलेल्या एखाद्या परागंदा गुन्हेगाराला, जेव्हा केंद्र सरकारकडून विनंती करण्यात आल्यावरून, विदेशी राज्यांनी प्रत्यर्पित केले किंवा परत पाठवले असेल आणि त्या विदेशी राज्याच्या कायद्यात अशा एखाद्या अपराधासाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद नसेल तेव्हा, असा परागंदा गुन्हेगार त्या अपराधासाठी फक्त जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र राहील.]

**अधिसूचित आदेश व अधिसूचना संसदेपुढे ठेवणे.**

३५. या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेला प्रत्येक अधिसूचित आदेश किंवा काढण्यात आलेली अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

३६. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील, त्या बाबी अशा :-----

(क) एखाद्या परागंदा गुन्हेगाराला प्रत्यर्पित करण्याबाबतची मागणी ज्या नमुन्यात करावयाची तो नमुना

(ख) प्रकरण तीन लागू असलेल्या एखाद्या [2][विदेशी राज्या] मध्ये कोणत्याही व्यक्तीला पकडण्यासाठी ज्या नमुन्यात वॉरंट काढण्यात येईल तो नमुना ;

(ग) या अधिनियमान्वये वॉरंट ज्या रीतीने पृष्ठांकित किंवा अधिप्रमाणित करण्यात येईल ती रीत ;

(घ) या अधिनियमान्वये आरोप असलेल्या किंवा अभिरक्षेत असलेल्या परागंदा गुन्हेगारांना इतरत्र हलवणे आणि त्यांना स्वीकृत करण्यासाठी हक्कदार म्हणून ज्या व्यक्तींची नावे वॉरंटमध्ये नमूद केली असतील त्यांच्याकडे त्यांना सुपूर्द केले जाईपर्यंतच्या कालावधीत त्या गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे व त्यांची देखभाल करणे ;

(ङ) हा अधिनियम ज्याला लागू होतो अशा कोणत्याही अभिकथित अपराधाची विषयवस्तू असलेली किंवा अपराध सिध्द करण्यासाठी आवश्यक असेल अशी कोणतीही मालमत्ता ताब्यात घेणे आणि तिची विल्हेवाट लावणे ;

(च) या अधिनियमान्वये, दंडाधिकाऱ्याने आपला अहवाल ज्या नमुन्यात व ज्या रीतीने किंवा ज्या मार्गाने केंद्र सरकारला देणे आवश्यक असेल तो नमुना, ती रीत व तो मार्ग ;

(छ) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम १७ द्वारे मूळ कलम ३४ ऐवजी ही कलमे दाखल करण्यात आली (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१८ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक लागोपाठाची सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूणे तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

निरसन आणि व्यावृत्ती

**३७.** (१) भारतीय प्रत्यर्पण अधिनियम, १९०३ (१९०३ चा १५) आणि १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग ख राज्ये समाविष्ट केलेल्या ज्या राज्यक्षेत्रांमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी तेथे अंमलात असलेला कोणताही तत्सम कायदा आणि ईशान्य सरहद अभिकरण आणि तुईसंग जिल्हा (प्रत्यर्पण) विनियम, १९६१ (१९६१ चा ३) नॉर्थ ईस्ट फ्रंटीयर एजन्सी अँड तुरनसँग डिस्ट्रीकट (एक्स्ट्रॅडिशन) रेग्युलेशन, १९६१ याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

(२) प्रत्यर्पण अधिनियम, १८७० ते १९३२ आणि परागंदा अपराधी अधिनियम, १८८१ हे भारतात जेथपर्यंत लागू असतील आणि भारतीय कायद्याचा भाग म्हणून अंमलात असतील तेथवर, ते याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

## [1][अनुसूची

[कलम ३१ (२) पहा]

### राजकीय स्वरूपाचे म्हणून मानण्यात येणार नाहीत असे अपराध

अभिकथित अपराधाच्या दिनांकी भारतात अंमलात असलेल्या कायद्यानुसार पुढील अपराध सूचीचा अन्वयार्थ लावण्यात येईल. जेथे जेथे संबंधित अधिनियमाच संदर्भ देण्यात आलेला नाही तेथे, उल्लेख केलेली कलमे ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) यांची कलमे आहेत :-----

१. अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२ (१९८२ चा ६५) खालील अपराध.

२. नागरी विमानचालन सुरक्षेचे उल्लंघन करणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांचे दमन अधिनियम, १९८२ (१९८२ चा ६६) खालील अपराध.

३. न्यूयॉर्क येथे १४ डिसेंबर १९७३ रोजी सह्या करण्यात आलेल्या करारामधील राजनैतिक अभिकर्त्यांसह आंतरराष्ट्रीय स्तरावरील संरक्षित व्यक्तीविरुद्धच्या गुन्ह्याचा, शिक्षेबाबतच्या कराराच्या कक्षेत येणारा अपराध.

४. न्युयॉर्क येथे १८ डिसेंबर १९७९ रोजी सह्या करण्यात आलेल्या ओलीस ठेवण्याविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय कराराच्या कक्षेत येणारा एखादा अपराध.

५. सदोष मनुष्यवध, खून (कलमे २९९ ते ३०४).

६. धोकादायक शस्त्रे किंवा साधनांद्वारे जाणीवपूर्वक जखमी करणे किंवा गंभीर जखमी करणे (कलम ३२१ ते ३३३).

७. स्फोटक द्रव्ये अधिनियम, १९०८ (१९०८ चा ६) खालील अपराध.

८. जीविताला धोका पोहोचवण्याच्या हेतूने दारूगोळा हत्यार किंवा दारूगोळा बाळगणे [शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) चे कलम २७].

९. अटक किंवा स्थानबद्धतेस प्रतिकार किंवा प्रतिबंध करण्याच्या हेतूने दारूगोळा हत्याराचा वापर करणे [शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) चे कलम २८].

१०. सार्वजनिक उपयोगितेसाठी किंवा अन्यथा वापरण्यात येणाऱ्या मालमत्तेची, जीविताला धोका पोहोचवण्याच्या उद्देशाने हानी किंवा नुकसान करणे (कलम ४४० सह कलम ४२५ वाचा).

११. अन्याय्य रीतीने अटकाव करणे आणि अन्याय्य रीतीने परिरोध करणे (कलमे ३३९ ते ३४८).

१२. बालापहरण आणि अपहरण तसेच, ओलीस ठेवून घेणे (कलमे ३५९ ते ३६९).

१३. दहशतवाद आणि दहशतवादी कृत्ये या संबंधातील अपराध [दशहतवादी व विध्वंसक कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २८)].

१४. वर यादी दिलेला कोणताही अपराध करण्यास अपप्रेरणा देणे, कट करणे किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करणे, चिथावणी देणे, सह अपराधी म्हणून सहभागी होणे].

---

१. १९९३ चा अधिनियम ६६, कलम १८ द्वारे मूळ अनुसूच्यांएेवजी दाखल केली (१८ डिसेंबर १९९३ रोजी व तेव्हापासून).

# THE EXTRADITION ACT, 1962

## प्रत्यर्पण अधिनियम, १९६२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquittal | दोषमुक्ती | [section 31(*1*)(*d*)] |
| alleged offence | अभिकथित अपराध | [section 36 (*e*)] |
| apprehension | पकडणे | [section 19 (*2*)] |
| authenticated | अधिप्रमाणित | [section 10 (*d*)] |
| authority | प्राधिकारपत्र | [section 15] |
| barred by time | मुदतबाह्य | [section 31 (*21*)] |
| certified copies | प्रमाणित प्रती | [section 9 (*2*)] |
| commit | सुपूर्द | [section 7 (*4*)] |
| composite offence | संयुक्त अपराध | [section 2 (*1*)] |
| convention | अभिसंधी | [section 3 (*4*)] |
| convicted | दोष सिद्ध झालेला | [section 2 (*b*)] |
| conviction | दोषसिद्धी | [section 2 (*b*)] |
| custody | अभिरक्षा | [section 17 (2)] |
| detain | स्थानबद्ध | [section 17 (*2*)] |
| duly authenticated | रीतसर अधिप्रमाणित | [section 10 (*2*)] |
| endorsed warrant | पृष्ठांकित वॉरंट | [section 14] |
| exhibits and dipositions | निशाण्या व जबान्या | [section 10 (*1*)] |
| extradition | प्रत्यर्पण | [section 1 (*1*)] |
| extradition arrangement | प्रत्यर्पण ठराव | [section 12 (*1*)] |
| extradition offence | प्रत्यर्पण अपराध | [section 2 (*c*)] |
| extradition treaty | प्रत्यर्पण संधी | [section 2 (*c*)(i)] |
| fugitive criminal | परागंदा गुन्हेगार | [section 2 (*f*)] |
| incite | अपप्रेरणा | [section 2 (*f*)] |
| in session | सत्रासीन, | [section 36 (*3*)] |
| in support of the requisition | मागणीच्या पुष्ट्यर्थ | [section 7 (2)] |
| Judicial Document | न्यायिक दस्तऐवज | [section 10 (*1*)] |
| lesser offence | सौम्य अपराध | [section 31 (*i*) (*c*) |
| liability | दायित्व | [section 22] |
| notified order | अधिसूचित आदेश | [section 2 (*h*)] |
| simultaneous | एकसमयावच्छेदी | [section 3 (*m.n.*)] |
| treaty state | संधीकरार केलेले राज्य | [section 2 (*j*)] |

# प्रत्यर्पण अधिनियम, १९६२

# EXTRADITION ACT, 1962

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिप्रमाणित | authenticated | [कलम १० (घ)] |
| अधिसूचित आदेश | notified order | [कलम २ (ज)] |
| अपप्रेरणा देणे | incite | [कलम २ (च)] |
| अभिकथित अपराध | alleged offence | [कलम ३६ (ङ)] |
| अभिरक्षा | custody | [कलम १७ (२)] |
| अभिसंधी | convention | [कलम ३ (४)] |
| एकसमयावच्छेदी | simultaneous | [कलम ३ समास टीप] |
| तात्पुरता वॉरंट | provisional warrant | [कलम १४] |
| दायित्व | liability | [कलम २२] |
| दोषमुक्ती | acquittal | [कलम ३१ (१) (घ)] |
| दोष सिद्ध झालेला | convicted | [कलम २ (ख)] |
| दोषसिद्धी | conviction | [कलम २ (ख)] |
| निशाण्या व जबान्या | exhibits and depositions | [कलम १० (१)] |
| न्यायिक दस्तऐवज | judicial document | [कलम १० (१)] |
| पकडणे | apprehension | [कलम १९ (२)] |
| परागंदा गुन्हेगार | fugitive criminal | [कलम २ (च)] |
| पृष्ठांकित वॉरंट | endorsed warrant | [कलम १४] |
| प्रत्यर्पण | extradition | [कलम १ (१)] |
| प्रत्यर्पण अपराध | extradition offence | [कलम २ (ग)] |
| प्रत्यर्पण ठराव | extradition arrangement | [कलम १२ (१)] |
| प्रत्यर्पण संधी | extradition treaty | [कलम २ (ग) (एक)] |
| प्रमाणित प्रती | certified copies | [कलम ९ (२)] |
| प्राधिकारपत्र | authority | [कलम १५] |
| मागणीच्या पुष्ट्यर्थ | in support of the requisition. | [कलम ७ (२)] |
| मुदतबाह्य | barred by time | [कलम ३१ (२१)] |
| रीतसर अधिप्रमाणित | duly authenticated | [कलम १० (२)] |
| वस्तुस्थितिनिदर्शक अधिकृत प्रमाणपत्रे | official certificates of facts | [कलम १० (१)] |
| सकृतदर्शनी | prima facie | [कलम ७ (३)] |
| सत्रासीन | in session | [कलम ३६ (३)] |
| सुपूर्द | commit | [कलम ७ (४)] |
| सौम्य अपराध | lesser offence | [कलम ३१ (१) (ग) (एक)] |
| संधीकरार केलेले राज्य | treaty state | [कलम २ (ञ)] |
| संयुक्त अपराध | composite offence | [कलम २ (एक)] |
| स्थानबद्ध | detain | [कलम १७ (२)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई